# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 166/2022 दिनांक : 24.04.2022

## 1)घरफोडी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 22.04.2022 रोजी चे 11.30 ते 12.15 वा. चे दरम्यान, **विकास नगर कौठा जयपार्वती अपार्टमेंट, नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांची पत्नी हि घराची कडी लावून खालच्या मजल्यावरील फिर्यादीच्या भावाच्या घरी गेली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराची कडी काढुन आत प्रवेश करुन रुम मधील लोखंडी कपाटातील लॉकर कशाने तरी तोडुन सोन्याचे दागीने एकुण किंमती 5,52,000/–रुपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी अनिल शंकरलाला खियानी, वय 43 वर्षे, व्यवसाय कापड व्यापार रा. विकासनगर कौठा जयापार्वती अपार्टमेंट, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 243/2022 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री कोरे, मो.क्र. 8888836607** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**भाग्यनगर :–** दिनांक 19.04.2022 रोजी चे 01.00 ते 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर जुनेगाव तरोडा बु. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्पेलंडर काळया रंगाची मो सा क्रं. एमएच–26/जे–2826 किमती 16,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी परमेश्वर देवराव मुळे, वय 35 वर्षे, व्यवसाय शेती रा. तरोडा बु. जुनेगाव, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 142/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2178 गोणारकर, मो.क्र. 9689715358** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :–

**हिमायतनगर :–**दिनांक 18.04.2022 रोजी चे 19.00 वा. ते दिनांक 19.04.2022 रोजी चे 06.00 वा. दरम्यान, **गंगाधर मामिळकर यांचे मालकीचे शेडमध्ये हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे दोन गाय व एक गोरे व साक्षीदार यांचे दोन गोरे असे एकुण किंमती 60,000/–रुपयाचे कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी अबदुल सत्तार अब्दुल अजीज, वय 25 वर्षे, व्यवसाय मेकॅनिक रा. मोमीनपुरा हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 74/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2303 सिंगनवाड, मो. क्र. 9049035521** हे करीत आहेत.

## 4)मोबाईल चोरी :–

**1)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 22.04.2022 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **महाराजा इलेक्ट्रॉनीक चे बाजुला नवीन कौठा नांदेड येथे,** यातील फिर्यादी चा रियलमी नारझो 30 कंपनीचा मोबाईल किंमती 15,999/– रुपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयाने गर्दीमध्ये पॅन्टच्या खिशातुन चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी सुयोग नरहरी गडम, वय 40 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. विनायकनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 244/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री गिते, मो.क्र. 9158762002** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–**दिनांक 22.04.2022 रोजी चे 13.00 वा. ते 13.30 वा. चे दरम्यान, **सदगुरु मोबाईल शॉपी, वजिराबाद, नांदेड येथे,** यातील फिर्यादी मोबाईल शॉपीमधुन ओपो एफ 19 प्रो प्लस 5 जी मोबाईल किंमती 20,000/– रुपयाचा कोणीतरी अज्ञात दोन चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी प्रसाद गजानन वंचेवार, वय 25 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. मालपाणी बिल्डींग वजिराबाद, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 130/2022 कलम 379,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/श्री गिते, मो.क्र. 9158762002** हे करीत आहेत.

## 5)चोरी :–

**हिमायतनगर :–**दिनांक 20.04.2022 रोजी चे 01.30 वा. ते 06.00 वा. चे दरम्यान, **मौजे जवळगाव ता. हिमयातनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी काम करत असलेले इंडस कंपनीचे मोबाईल टॉवरचे अमर राजा कंपनीचे एकुण 19 बॅटरी व एक रेक्टीफायर एकुण किंमती 40,000/– रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी मधुकर रमेश गायकवाड, वय 26 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. आनंदनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 75/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2303 सिंगनवाड, मो.क्र. 9049035521** हे करीत आहेत.

## 6)अपघात :–

**1)कुंटूर :–** दिनांक 21.04.2022 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **कुंटूर फाटा येथील आकाश पेट्रोल पंपा समोरील सोमठाणा ते नायगाव जाणारे रोडवर ता. नायगाव जि.नांदेड येथे,** यातील **फिर्यादी व मयत नामे गोविंद जयंतराव कदम वय 75 वर्षे रा. सोमठाणा ता. नायगाव** असे दोघे त्यांचे मोटार सायकलवर बसुन जात असताना यातील नमुद ट्रक क्र. आरजे/07–जीसी–8795 चा चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हि हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मोटार सायकलला पाठीमागुन जोराची धडक दिल्याने मयत यास गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी सुरज सुभाषराव कदम वय 25 वर्षे व्यवसाय शेती रा. सांगवी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं. 69/2022 कलम 279,304(अ),337 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री दिनेश येवले, मो.क्र. 7798597775** हे करीत आहेत

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 23.04.2022 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **वाजेगाव ते मुदखेड जाणारे रोडवर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा मयत नामे शेख आयान शेख शादुल वय 12 वर्षे रा. हनुमान मंदीराजवळ वाजेगाव, नांदेड** हा किराणा सामान घेवून घराकडे येत असतांना नमुद ठिकाणी यातील आयचर क्र. एमएच/44–यु–1804 चा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास पाठीमागुन जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी शेख शादुल शेख सलीम वय 40 वर्षे व्यवसाय मजुरी रा. हनुमान मंदीराजवळ, वाजेगाव नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं. 246/2022 कलम 279,304(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/एम.डी.हंबर्डे, मो.क्र. 9118583878** हे करीत आहेत.

**3)धर्माबाद :–** दिनांक 22.04.2022 रोजी 20.00 वा. ते 20.30 वा. चे दरम्यान, **धर्माबाद ते कंदकुर्ती जाणारे रोडवर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **चुलत भाऊ मयत नामे सोपान भगवान देशमुख वय 32 वर्षे रा. गोपाळनगर सांगवी बु. ता. जि. नांदेड** हा त्याची मो.सा. क्रं. एम.एच./26–बीए–1266 हिच्यावर ट्रॅक्टरचे हायड्रोलीक काम करण्यासाठी धर्माबाद येथे आला होता तो काम करुन परत जात असताना नमुद ठिकाणी यातील ट्रॅव्हल्स क्र. एमएच/26–बीई–6271 चा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन ट्रॅव्हल्स हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन मयत यास जोराची धडक दिल्याने गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी सोमनाथ विठ्ठल देशमुख वय 29 वर्षे व्यवसाय खाजगी नौकरी रा. गोपाळनगर, सांगवी बु. ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं. 110/2022 कलम 279,304(अ) भादवी सह कलम 134 मो.वा.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री वाडेकर, मो.क्र. 9067081223** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**वजिराबाद :–** दिनांक 23.04.2022 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **भगतसिंग रोड चौरस्ता, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी त्याचे ताब्यात विनापरवाना बेकायदेशीर रित्या घातक शस्त्र दोन खंजीर व नगदी असे एकुण 99,600/– रुपयाचे मुद्देमालासह जवळ बाळगलेले संशयीत रित्या मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोका/148 व्यंकट नागनाथ गंगुलवार, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 129/2022 कलम 4/25 भा.ह. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/452 उतकर, मो.क्र. 9921155166** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 23.04.2022 रोजी चे 11.20 वा. चे सुमारास, **चंदासिंग कॉर्नर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2410/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/492 संतोष रघुनाथ जाधव, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 245/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2121 पांचाळ, मो.क्र. 9011079556** हे करीत आहेत.

**2)कंधार :–** दिनांक 23.04.2022 रोजी चे 14.45 वा. चे सुमारास, **कंधार गांधी चौक ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1240/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गोपाळ चंद्रपाल इंद्राळे, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 127/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/गणाचार्य, मो.क्र. 9011079556** हे करीत आहेत.

**3)कंधार :–** दिनांक 23.04.2022 रोजी चे 13.00 वा. चे सुमारास, **कंधार सिकंदर मटन शॉपचे बाजुला ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1370/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री आदित्य निवृत्तीराव लोणीकर, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 126/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/गणाचार्य, मो.क्र. 9011079556** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :—

**1)देगलुर :—** दिनांक 23.04.2022 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **देगलुर कॉलेज समोर रोडवर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या एका अॅपे अॅटोत शिंदी चे बॉटल एकुण किंमती 1,12,000/—रुपयाचे मुद्देमालासह चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री श्रीकांत माधवराव मोरे, ने. पोस्टे देगलूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 198/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/580 तलवारे, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :—** दिनांक 23.04.2022 रोजी चे 15.35 वा. चे सुमारास, **तेहरानगर नांदेडचे कंपाउडचे पाठीमागे मोकळया मैदानात, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शिंदी एकुण किंमती 5375/—रुपयाचे मुद्देमालासह चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आली. वगैरे **फिर्यादी पोना/709 दिलीप भोजसिंग राठोड, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 153/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/835 बामणे, मो.क्र. 8308878094** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 167 / 2022 दिनांक : 24.04.2022**

नांदेड शहरामध्ये काही टारगट मुले आपले दुचाकी वाहनामध्ये बदल करुन सायलन्सरचा कर्कश आवाज करत शहरामध्ये दहशत निर्माण करत असुन त्यांचा त्रास मुली महिला व सामान्य नागरिकांना होत आहे. त्यांचेवर कडक कार्यवाही करण्या सबंधाने **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड, यांनी आदेशित केले.

पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण चे पोलीस निरीक्षक, अशोक घोरबांड व त्यांचे अधिकारी व अंमलदारांनी शहरात व परिसरात पेट्रोलींग करीत असताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंती निमीत्त शांतता अबाधित राहणे साठी खालील वाहने डीटेन करुन पोलीस स्टेशनला लावण्यात आले व त्यांचा अहवाल प्रादेशिक परिवहन विभाग, नांदेड यांना पाठविण्यात आला त्यांचे टिमने परिक्षण करुन अहवाल सादर केला व त्यांच्या कायदेशिर परवानगी शिवाय वाहनामध्ये बदल केल्या अनुषंगाने खालील प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.

| अ.क्रं. | वाहन क्रमांक | दंड |
|---|---|---|
| 01 | एम.एच./26—एफ—3866 | 7000/— |
| 02 | एम.एच./26—बीएच—4211 | 4000/— |
| 03 | एम.एच./26—बीझेड—7406 | 1500/— |
| 04 | एम.एच./26—बीएस—5506 | 2500/— |
| 05 | एम.एच./38—वाय—3632 | 9500/— |
| 07 | एम.एच./26—एल—3700 | 3500/— |
| 08 | एम.एच./26—बीझेड—9746 | 4000/— |
| 09 | एम.एच./26—सीए—5530 | 3000/— |

नांदेड पोलीस दलातर्फे जनतेला आवाहन करण्यात येते की, लोकांनी आपले वाहनात कोण्यत्याही प्रकारचा बदल करु नये ज्यामुळे सामान्य जनतेला त्रास होईल असे सायलेन्सर काढुन कर्ण कर्कश आवाज काढुन ध्वनी प्रदुषण करणे, वाहनावर डि.जे. लावुन वाजवी पेक्षा जोरात आवाज करणे इत्यादी जे लोक आपले वाहनात अनावश्यक बदल करुन कर्ण कर्कश आवाज काढुन सामान्य जनतेला त्रास होईल असे कृत्य करतील अश्या लोकांनवर नांदेड पोलीस दलातर्फे लक्ष ठेवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

सदरची कार्यवाही **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे आदेशाने **मा. श्री निलेश मोरे**, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, **मा. सिध्देश्वर भोरे,** उप विभागीय पोलीस अधिकारी, इतवारा, यांचे मार्गदर्शनाखाली **पोनि अशोक घोरबांड**, पोस्टे नांदेड ग्रामीण चे अधिकारी व अंमलदार व **प्रादेशिक परिवहन विभाग, नांदेड** चे अधिकारी व कर्मचारी यांनी केली.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


OPPO A53
2022/04/23 18:07